
## पुणे मेट्रोसाठी हलक्या व उर्जाबचत करणाऱ्या ट्रेनच्या डब्यांची बांधणी प्रगतीपथावर



पुणे मेट्रोचे वनाझ ते रामवाडी आणि पी.सि.एम.सी. ते स्वारगेट या मार्गांचे ४८% काम पूर्ण झालेले आहे. पुणे मेट्रोचे व्हायडक्त, स्टेशन, डेपो, व भूमिगत मार्ग यांचे काम प्रगतीपथावर आहे. पुणे मेट्रोसाठी लागणाऱ्या ट्रेनच्या डब्यांची कॉन्ट्रॅक्ट टिटागढ-फिरेमा या कंपनीला देण्यात आले होते. टीटागढ-फिरेमा या कंपनीने मेट्रोच्या डब्यांच्या बांधणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा कलकत्ता येथे फॅक्टरीमध्ये उभारली असून मेट्रोच्या कोचची (डब्यांची) बांधणी सुरू केली आहे. पुणे मेट्रोसाठी एकूण 3 डब्यांचे 34 ट्रेन संच ही कंपनी पुरविणार आहे.

पुणे मेट्रोसाठी बनविण्यात येणाऱ्या ट्रेनच्या डब्यांच्या प्रतिकृतीचे अनावरण दि. 9 जानेवारी 2021 रोजी

टीटागढ-फिरेमा या कंपनीमध्ये करण्यात आले. या वेळी श्री. दुर्गाशंकर मिश्रा, (चेअरमन महामेट्रो व सचिव शहरी विकास मंत्रालय भारत सरकार), श्री. डॉ. ब्रिजेश दीक्षित (व्यवस्थापकीय संचालक महामेट्रो) आणि श्री. सुनील माथुर (संचालक महामेट्रो) हे उपस्थित होते. पुणे मेट्रोसाठी बनवण्यात येणाऱ्या कोचेस या अल्युमिनियम या धातूच्या असून या भारतात वापरण्यात येणाऱ्या इतर मेट्रो डब्यांपैकी सर्वात हलके आहेत. सर्वसाधारण भरतात वापरण्यात येणाऱ्या मेट्रो डब्यांचा ऐक्सल लोड 16.4 टन असतो, परंतु पुमे मेट्रोसाठी बनवण्यात येणाऱ्या डब्यांची ऐक्सल लोड 15.4 टन  इतका असणार आहे. यामुळे मेट्रो चालवण्यासाठी लागणाऱ्या डिझेलची 2% पर्यंत बचत होणार आहे.



या पूणेमेट्रोच्या डब्यांमध्ये अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार असून एका डब्यामध्ये 48 लोकांना बसण्याची व्यवस्था असणार आहे. 3 कोच लांबीच्या एका मेट्रोमध्ये ट्रेन मधे साधारणतः 850 लोक प्रवास करू शकतील.




टीटागढ-फिरेमा या कंपनीने त्यांच्या कलकत्ता येथील कारखान्यात अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून मेट्रो कोच बनवण्याची सुविधा बांधली आहे. या सुविधेचा पाहणी करण्यासाठी श्री. दुर्गाशंकर मिश्रा, (चेअरमन महामेट्रो व सचिव शहरी विकास मंत्रालय भारत सरकार), श्री. डॉ. ब्रिजेश दीक्षित (व्यवस्थापकीय संचालक) आणि श्री. सुनील माथुर (संचालक महामेट्रो) यांनी भेट दिली व निरीक्षण करून गुणवत्तेबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच महामेट्रोने पुणे मेट्रोसाठी बनविण्यात येणाऱ्या कोचच्या निर्मितीवर लक्ष्य ठेवण्यासाठी निरीक्षकाची नेमणूक केली आहे. टीटागढ-फिरेमा कंपनीच्या कलकत्ता येथील कंपनीत पुणे मेट्रोच्या काचेची चाचणी मे महिनीच्या अखेरीस सुरू होईल.

याप्रसंगी महामेट्रोचे व्यापास्थापकीय संचालक श्री. डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी म्हंटले आहे की, 'पुणे मेट्रोसाठी बनवण्यात येणारे मेट्रोचे डबे हे अल्युमिनियम पासून बनविण्यात येणार असून वजनाने भारतातील सर्वात हलके मेट्रोचे डबे असणार आहेत. या डब्यांमुळे ऊर्जेची मोठ्याप्रमाणात बचत होणार आहे.